

खुर्शिदः लोकप्रिय गायिका-नायिका

१९४०च्या दशकात हिंदी चित्रपटसृष्टीतले अनेक नायक-नायिका प्रकाशात आले. अभिनयाबरोबरच संगीताची जाण असणं ही त्याकाळची आवश्यकता होती. नशिबाने खुर्शिदकडे दोन्ही गोष्टी भरभरून होत्या. म्हणूनच गायिका-नायिका म्हणून तिची पडद्यावरची कारकीर्द समृद्ध बनली.

□ भगवतीकुमार शर्मा

खुर्शिद १९४० च्या दशकातली हिंदी चित्रपटसृष्टीतली एक ख्यातनाम अभिनेत्री आणि गायिका. तिच्या गाजलेल्या लोकप्रिय गीतांपैकी 'गा, रे मनवा, घटा घनघोर घोर, मोर मचाये शोर, मेरे सजन, पहेले जो मुहोब्बत से इन्कार किया होता, बदरीया बरस गई उसपार वगैरे गाणी मागच्या पिढीतल्या संगीत रसिकांच्या ओठावर आजही असतील. १८ एप्रिल रोजी पाकिस्तानस्थित खुर्शिद वयाच्या ८७ व्यां वर्षी काळाच्या पडद्याआड गेली. एप्रिल महिन्यात तिचं देहावसान झालं. म्हणजे आता तशी ही घटना जुनी झाली. पण हिंदी चित्रपटसृष्टीला वाहून घेतलेल्या या गायिकेच्या निधनाची म्हणावी तशी दखल घेतली गेली नाही. म्हणूनच आज तिच्या कारकीर्दीबद्दल आणि लोकप्रिय गाण्यांबद्दल बोलून तिला खरी श्रद्धांजली वाहण्याचा हा एक प्रयत्न आहे.

खुर्शिदचं खरं नाव होतं इर्शाद बेगम. १४ एप्रिल १९१४ रोजी लाहोरजवळील चोबना या गावी तिचा जन्म झाला. शिक्षणाची इर्शादला अजिबात आवड नव्हती. मात्र सिनेमाचं भारी वेड. या वेडापायी एक दिवस वडिलांचं घर सोडून ती आपल्या मानलेल्या भावाच्या घरी निघून आली. तिथून तिने कलकत्त्याची वाट धरली आणि तत्कालीन लोकप्रिय चित्रपट निर्मिती संस्था भावना थिएटर्ससाठी मिस शैला या नावाने अभिनयाला सुरुवात केली. जेणेकरून तिच्या परंपरावादी कुटुंबाला तिच्या चित्रपटात काम करण्यामुळे काही त्रास होऊ नये हा त्यामागचा हेतू होता.

१९३१ ते ३३ या दोन वर्षांत खुर्शिदने *लैला मजनू, शकुंतला, गुल बकावली, हठीली दुल्हन, मुहसिल आशिक* आणि *नकली डॉक्टर* या सहा चित्रपटांत नायिका म्हणून काम केलं.

त्या काळात नायक आणि नायिकांना चित्रपटातली स्वतःची गाणी स्वतःच गावी लागत. पार्श्वगायनाची पद्धत फारशी विकसित झालेली नव्हती. शिवाय खुर्शिदचा गळा निसर्गतःच गोड होता. त्यामुळे तिला चित्रपटसृष्टीत नायिका आणि गायिका म्हणून बस्तान बसवण्यात काहीच अडचण आली नाही. १९३९-४०मध्ये खुर्शिदने एक दोन नाही तर वीसेक चित्रपटांत काम केलं. त्यातले बरेचसे चित्रपट सरोज मूव्हीटोनच्या बॅनरखाली बनलेले होते.

१९३५मध्ये पहिला पंजाबी बोलपट पडद्यावर आला. त्याचं नाव होतं *मिर्झा साहिबा*. त्यात खुर्शिदने नायिकेची भूमिका केली होती.

अनिल विश्वासचं संगीत दिग्दर्शन लाभलेल्या *शोख दिलरूबा* नावाच्या चित्रपटात 'मदहोशी मदहोशी है...' या गीतासाठी खुर्शिदने स्वतःचा स्वर दिला. हा चित्रपट १९३६ मध्ये प्रदर्शित झाला. पुढे १९४०च्या दरम्यान खुर्शिद मुंबईला आली आणि सरदार चंदुलाल शाहच्या सुप्रसिद्ध रणजित मूव्हीटोन या कंपनीशी जोडली गेली. इथून खुर्शिदच्या कारकीर्दीचा सुवर्णकाळ सुरू झाला. १९४० ते ४६ दरम्यान तिने चौदा चित्रपटांत अभिनय केला आणि गीतंही गायली. अनेक मान्यवर अभिनेत्यांबरोबर तिने काम केलं. विशेषतः मोतीलालबरोबर तिची जोडी पडद्यावर चांगलीच जमली. हाली, परदेसी, मूर्ती, फूलवारी वगैरे मोतीलालबरोबरचे तिचे चित्रपट चांगलेच गाजले. गुजराती अभिनेता ईश्वरलालबरोबर मुसाफिर, शादी, आपत्ती हे चित्रपट केले तर आजचा आघाडीचा नायक गोविंदा याचे वडील अरुण अहुजांबरोबर *बेटी* आणि *नर्स*मध्ये तर शेख मुख्तारबरोबर *शहेनशाह बाबर*मध्ये काम केलं. घाऱ्या डोळ्यांचा नायक चंद्रमोहनबरोबर मुमताज महल, त्रिलोक कपूरबरोबर *प्रभू का घर* चित्रपटांत खुर्शिदने आपली अभिनय आणि गायन कला पणाला लावली. तरीही या काळाला तिच्या कारकीर्दीतला सुवर्णकाळ म्हणता येणार नाही. कारण तिला सोन्याचे दिवस यानंतरच दिसले.



खुर्शिदः कोमल व्यक्तिमत्त्व, कठोर परिश्रम

तत्कालीन लोकप्रिय अभिनेता-गायक कुंदनलाल सैगलबरोबर खुर्शिदने *भक्त सूरदास* आणि *तानसेन* या दोन चित्रपटांत काम केलं. या दोन्ही चित्रपटांत सैगलबरोबर गाण्याचीही संधी तिला मिळाली. या चित्रपटातली तिची गाणी चांगलीच लोकप्रिय झाली.

रणजितच्या चित्रपटांत जयंत देसाई आणि चतुर्भुज दोशींसारख्या गुजराती दिग्दर्शकांचं वर्चस्व होतं. तर संगीत दिग्दर्शक म्हणून खेमचंद्र प्रकाश, ज्ञानदत्त, बुलो-सी, रामजी आणि हंसराज बहल यांचा बोलबाला होता. या सर्व दिग्दर्शक आणि संगीत दिग्दर्शकांबरोबर खुर्शिदने प्रामुख्याने काम केलं.

त्या कालावधीत खुर्शिदने अनेक गाणी गायली. 'पहेले जो मुहब्बत से इन्कार किया होता...' (परदेसी), 'पंछी बावरा, चांद से प्रीत लगा ले, मधुर मधुर गा रे मनवा आणि चांद और तारे खिले है...' (के. एल. सैगलबरोबर), 'भूलानेवाले भूला पे भी याद आते है...' (इन से आजादी), 'घटा घनघोर घोर...' (के. एल. सैगल), 'बरसो रे कोई बदरवा, पिया पे बरसो...' (तानसेन), 'बदरिया बरस गई उस पार...' (मुकेश आणि हमीदाबरोबर-मूर्ती) या चित्रपटगीतांनी खुर्शिदला अत्यंतिक लोकप्रियता मिळवून दिली. यातलं बदरीया बरस गई उस पार हे बुलो-सी. राजाने संगीतबद्ध केलेलं गाणं इतकं लोकप्रिय झालं होतं की त्यावेळी रेडियोवर फिल्मी गीतांच्या फर्माईशीचा पंचेचाळीस मिनिटांचा कार्यक्रम असायचा. त्यात या गाण्याची फर्माईश करणाऱ्या श्रोत्यांची नावं वाचण्यातच चाळीस मिनिटं जायची आणि मग हे गाणं लागायचं. या गीताबरोबरच कार्यक्रम संपायचा. क्वचित एखाद्या गाण्याला इतकी लोकप्रियता मिळते.

१९४६मध्ये खुर्शिदने लाला वाकुब नावाच्या अभिनेत्याबरोबर लग्न केलं. मुसाफिर चित्रपटात तिने वाकुबबरोबर अभिनयही केला होता.

रणजित मूव्हीटोनव्यतिरिक्त इतर बॅनर्ससाठीही खुर्शिदने कामं केली. प्रभात फिल्म कंपनीच्या *आगे बढो*मध्ये देव आनंदबरोबर, *मोक्ष*मध्ये सादिक अलीबरोबर, मिनर्व्हा मूव्हीटोनच्या *मंजधारा*मध्ये गायक-अभिनेता सुरेंद्रबरोबर तिने नायिकेची कामं केली होती.

त्याचवेळी भारताच्या फाळणीचे वारे वाहू लागले होते. मलिका-ए-तरन्नुम नूरजहाँ, विनोदी नट नूर मोहम्मद चार्ली वगैरे कलाकारांनी पाकिस्तानची वाट पकडली. खुर्शिदही भारताला राम राम ठोकून पाकिस्तानला रवाना झाली. तेव्हा भारतातला तिचा शेवटचा चित्रपट आपबिती प्रदर्शित झालेला होता. भारतात खुर्शिदने चाळीस-पन्नास चित्रपटांत काम केलं. त्यावेळी खुर्शिद नावाचीच एक ज्युनियर अभिनेत्रीही हिंदी चित्रपटसृष्टीत होती.

पाकिस्तानला गेल्यावर खुर्शिदने दोन चित्रपट केले, पण दोन्हीही अयशस्वी ठरले. १९६९मध्ये खुर्शिद मुंबईला आली होती. लाला वाकुबबरोबर विवाहविच्छेद झाल्यानंतर युसूफ भाईमिया नावाच्या व्यापाऱ्याबरोबर तिने लग्न केलं. आणि कराचीला राहू लागली.

चार महिन्यांपूर्वी आपली जीवनयात्रा संपवून खुर्शिदने जगाचाच निरोप घेतला. दीडेक दशक भारतात आपल्या अभिनयाने आणि गायकीने रसिकांना वेड लावणारी खुर्शिद नंतर मात्र अज्ञातवासातच होती, पण तिच्या मधुर स्वरांच्या स्मृती आजही आपल्याकडे आहेत. त्यांची जपणूक आपण केली पाहिजे. ●